# पणन संचालनालय

मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

ई-मेल dirmktms@gmail.com, दूरध्वनी क्र. ०२२-२६१२६६२८, २६१२६७८५

जा.क्र.पणन-१/कृबास/१०४०/२०२० दि. १७/४/२०२०

**प रि प त्र क**

**विषय- कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी केलेल्या पहिल्या लॉकडाऊनच्या कालावधीत कापसाची हमी भावाने खरेदीसाठी कृषि उत्पन्न बाजार समिती यांना सूचना देणेबाबत.**

संदर्भ- १. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील पणन संचालक यांना पाठविलेले पत्र क्र. संकिर्ण-२०२०/उप सचिव/१०-स दि. १७ एप्रिल २०२०

२. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील मा.जिल्हाधिकारी यांना पाठविलेले पत्र क्र. संकिर्ण २०२०/प्रधान सचिव१०-स दि. १७ एप्रिल २०२०

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये शासनाने दिलेल्या निर्देशानुसार कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी देशात दि. २३.३.२०२० रोजी पासून लागू करण्यात आलेल्या पहिल्या टप्प्यातील लॉकडाऊनच्या कालावधीत केंद्रीय कापूस निगम (CCI) यांच्यामार्फत व CCI च्या वतीने महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादीत (MSCCGMF) मार्फत करण्यात येणारी कापसाची खरेदी मा.जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार स्थानिक स्तरावरील वेगवेगळ्या कारणास्तव बंद करण्यात आली होती.

देशात दुसऱ्या टप्प्यात लॉकडाऊनचा कालावधी दि ३.५.२०२० रोजीपर्यंत वाढविण्यात आला आहे. मात्र, या लॉकडाऊन कालावधी संदर्भात सुधारित मार्गदर्शक तत्त्वे केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने दि. १५.४.२०२० रोजी निर्गमित केलेली आहेत. या सुधारित मार्गदर्शक तत्त्वानुसार कृषि उत्पन्न बाजार समितीमधील कृषि शेतमालाची खरेदी-विक्री व कृषि शेतमालाची हमी भावाने खरेदी करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे राज्यात कापसाची हमी भावाने पुन्हा खरेदी सुरु करण्यासाठी खरेदी एजन्सी CCI व MSCCGMF यांना सहकार्य करण्याच्या सूचना बाजार समित्यांना देणेबाबत शासनाने कळविलेले आहे.

केंद्र शासनाने जाहीर केलेल्या हमी भावाच्या धोरणानुसार कापूस पणन महासंघ व केंद्रीय कापूस निगम हे राज्यात कापूस खरेदी करीत आहेत. शासनाच्या संदर्भिय पत्रानुसार देण्यात आलेले निर्देश व कापूस खरेदी प्रक्रिया सुरळीत होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे परिपत्रकीय सूचना देण्यात येत आहेत.

१. योजनेअंतर्गत फक्त शेतकऱ्यांचाच FAQ दर्जाचा कापूस खरेदी करावयाचा असून, खरेदी केंद्रावर आलेली व्यक्ती शेतकरीच असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.
२. खरेदी केंद्रावर खरेदी केलेला कापूस पाऊस, वादळ, आग इ. पासून सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी कापूस पणन महासंघाची राहील.
३. खरेदी केंद्रावर कापूस घेवून जाणाऱ्या शेतकऱ्यांची नोंदणी कृषि उत्पन्न बाजार समितीच्या स्तरावर करण्यात यावी. यासाठी बाजार समितीने स्वतंत्र टोकन रजिस्टर ठेवून त्या अंतर्गत शेतकऱ्यांची नोंदणी करुन त्यामध्ये

खरेदी केंद्रावर कापूस घेवून येणाऱ्या शेतकऱ्याचे नांव, संपर्क क्रमांक, कापूस खरेदीचा संभाव्य दिनांक,अंदाजे वजन व आवश्यकते प्रमाणे इतर तपशील नमूद करावा. टोकन रजिस्टरमध्ये शेतकऱ्यांची नोंदणी करताना कोणत्याही प्रकारची अनिमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. टोकन रजिस्टरमधील नोंद दररोज संध्याकाळी बाजार समितीचे सचिव व तालुका उप/सहाय्यक निबंधक यांनी साक्षांकित करावी व कोणत्याही परिस्थितीत सदर रजिस्टरमध्ये खाडाखोड, फेरबदल केले जाणार नाहीत याची खातरजमा करावी. दररोज साक्षांकित केलेल्या रजिस्टरच्या पृष्ठाची एक प्रत सहाय्यक निबंधक कार्यालयाच्या दप्तरी ठेवण्यात यावी.

४. शासन निर्देशाप्रमाणे एका दिवशी कमाल २० वाहने किंवा बाजार समिती व खरेदी केंद्राच्या क्षमतेप्रमाणे टोकन देण्याचा निर्णय स्थानिक पातळीवर घ्यावा. तथापि कोणत्याही परिस्थितीत गर्दी होवून कोरोना प्रादूर्भावाच्या पार्श्वभूमीवर Social distance व इतर नियमावलीचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

५. वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकार यांच्या निर्देशाप्रमाणे हमी भावाने फक्त Fair Average Quality (F.A.Q.) दर्जाच्या कापासाची खरेदी करणे बंधनकारक असल्याने, शेतकऱ्यांची नोंदणी करताना याची कल्पना शेतकऱ्यांना देवूनच नोंदणी करावी. कृषि उत्पन्न बाजार समितीद्वारे शेतकऱ्यांच्या वाहनांना टोकन देतेवेळी FAQ दर्जा पेक्षा खालच्या दर्जाचा/प्रतिचा कापूस आणल्यास तो हमी भावाने खरेदी न करता त्याची गाडी परत करण्यात येईल असे स्पष्टपणे अगोदरच शेतकऱ्यांना कृषि उत्पन्न बाजार समितीने अवगत करावे व त्याबाबतच्या SMS मध्ये देखील नमूद करावे व याबाबत व्यापक प्रसिध्दी द्यावी.

६. शेतकऱ्यांची नोंदणी करताना संब्रंधित शेतकऱ्याने यापूर्वी विक्री केलेला कापूस व पिक पेरा याबाबींचा मेळ घेवूनच शेतकऱ्यांची पात्रता निर्धारित करुन नोंदणी करावी.

७. सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांनी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ७/१२ चे उतारे मिळणेस्तव महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधावा.

८. कापूस पणन महांघाचे अधिकारी/बाजार समितीचे अधिकारी-कर्मचारी यांनी शेतकऱ्यांना नोंदणी करण्यास तसेच टोकन पध्दतीने कापूस खरेदी केंद्रावर घेवून जाण्यासाठी सर्वतोपरी मदत करावी व शेतकऱ्यांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी.

९. कापूस खरेदी प्रक्रियेमध्ये कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती सुरळीत राहणे आवश्यक आहे याबाबतीत सहकार खात्याचे अधिकारी, बाजार समित्या, कापूस पणन महासंघाचे अधिकारी यांनी संवेदनक्षम कापूस खरेदी केंद्राची तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्या संभाव्य घटकांची सविस्तर माहिती महसूल व पोलिस खात्याच्या संबंधित अधिकाऱ्यांना अगोदरच द्यावी व याबाबतीत तत्परतेने योग्य ती उपाययोजना होईल याची दक्षता घ्यावी. याबाबतीत तालुका उप/सहाय्यक निबंधक यांनी महसूल व पोलीस खात्याशी सतत समन्वय ठेवावा. तसेच जिल्हा उपनिबंधक यांनी मा.जिल्हाधिकारी यांचेशी सतत समन्वय ठेवून आवश्यकतेनुसार सर्व संबंधितांचा वेळोवेळी आढावा घ्यावा.

१०. हमी भावाने कापूस खरेदीची व्यवस्था सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे तालुकास्तरावर समिती गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. तालुका उप/सहाय्यक निबंधक | अध्यक्ष |
| २. कापूस पणन महासंघाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३. बाजार समितीचे सचिव | सदस्य सचिव |

वरील समितीस स्थानिक परिस्थितीनुसार काही निमंत्रितांचा समावेश करता येईल.

उपरोक्त समितीने शेतकऱ्यांची नोंदणी करुन त्याचे टोकन देणेस्तव दूरध्वनी/मोबाईल/SMS या प्रकारची कार्यपध्दती अवलंबून विनाकारण गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच याबाबतच्या कार्यपध्दतीस स्थानिक वृत्तपत्रात व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच तालुक्यातील कापूस खरेदी सुरळीत होण्यासाठी सर्व प्रकारची कार्यवाही करावी.

११. जिल्हा उपनिबंधक यांनी त्यांच्या जिल्ह्यातील कापूस खरेदी प्रक्रियेवर देखरेख ठेवावी. तसेच कापूस पणन महासंघ, CCI, बाजार समितीचे अनुज्ञप्तीधारक, खाजगी बाजार तसेच थेट पणन खरेदीदार यांनी खरेदी केलेल्या कापसाची माहिती दररोज संकलीत करुन त्यांचे कार्यालयात ठेवावी. तसेच जिल्ह्यातील कापूस खरेदीचे कामकाज सुरळीतपणे पार पाडले जात असल्याची खात्री करावी.

शासनाने कापूस उत्पादक जिल्ह्यातील मा.जिल्हाधिकाऱ्यांना संदर्भ क्र. २ दि. १७ एप्रिल २०२० च्या पत्रान्वये विस्तृत सूचना दिल्या असून, त्यातील सुचनांप्रमाणे मा.जिल्हाधिकाऱ्यांशी वेळोवेळी समन्वय ठेवून कापूस खरेदी प्रक्रिया सुरुळीत राहील याची जिल्हा उपनिबंधक यांनी दक्षता घ्यावी.

१२. विभागीय सहनिबंधक यांनी संबंधितांना दिलेले कामकाज अचूकपणे पार पाडण्यासाठी आवश्यकेनुसार आढावा सभा, अचानक भेटी देवून विभागातील कामकाजावर नियंत्रण ठेवावे.

(सुनिल पवार)
पणन संचालक
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रति,

सभापती/सचिव,
कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व कापूस उत्पादक जिल्हे)

प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव-

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (कापूस उत्पादक विभाग)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व कापूस उत्पादक जिल्हे)
त्यांना असेही कळविण्यात येते की, या परिपत्रकाची प्रत आपल्या जिल्ह्यातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, यांना पाठविण्यात यावी.

प्रत माहितीस्तव व उचीत कार्यवाहीस्तव सस्नेह-

१. मा.कार्यकारी संचालक,
महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्या., खेतान भवन, ६ वा मजला, १९८, जमशेठजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई-२०
२. भारतीय कपास निगम लि.,
कपास भवन, प्लॉट नं. ३-A, सेक्टर १०, पो.बॉक्स. नं. ६०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई- ४०० ६१४
३. मा.जिल्हाधिकारी (सर्व कापूस उत्पादक जिल्हे)

प्रत माहितीस्तव सविनय सादर-
मा.प्रधान सचिव, सहकार व पणन, मंत्रालय, मुंबई-३२

महाराष्ट्र शासन

तातडीचे

क्रमांक:संकिर्ण-२०२०/उप सचिव/१०-स
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १७ एप्रिल, २०२०.

प्रति,
पणन संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय:- कोविड-१९ च्या प्रसार रोखण्यासाठी केलेल्या लॉकडाऊनच्या कालावधीत कापूसाची हमी भावाने खरेदीसाठी कृषि उत्पन्न बाजार समिती यांना सुचना देणेबाबत.

महोदय,

कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी देशात दि.२३.०३.२०२० रोजी पासुन लागू करण्यात आलेल्या पहिल्या टप्प्यातील लॉकडाऊनच्या कालावधीत केंद्रीय कापूस निगम (CCI) यांच्यामार्फत व CCI च्यावतीने महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित (MSCCGMF) मार्फत करण्यात येणारी कापसाची खरेदी मा. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार स्थानिक स्तरावरील वेगवेगळया कारणास्तव बंद करण्यात आली होती.

२. देशात दुस-या टप्प्यात लॉकडाऊनचा कालावधी दि.०३.०५.२०२० रोजीपर्यंत वाढविण्यात आला आहे. मात्र, या लॉकडाऊन कालावधीसंदर्भात सुधारित मार्गदर्शक तत्वे केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने दि.१५.०४.२०२० रोजी निर्गमीत केल्या आहेत. या सुधारित मार्गदर्शक तत्वानुसार कृषि उत्पन्न बाजार समितीमधील कृषि शेतमालाची खरेदी-विक्री व कृषि शेतमालाची हमी भावाने खरेदी करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे राज्यात कापसाची हमी भावाने पुन्हा खरेदी सुरु करण्यासाठी खालीलप्रमाणे खरेदी एजन्सी CCI व MSCCGMF यांना सहकार्य करण्याच्या सुचना संबंधित सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.

(१) कृषि उत्पन्न बाजार समितीने शेतक-यांची नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करुन दयावी.

(२) नोंदणी केलेल्या शेतक-यांना शेतमाल खरेदी केंद्रावर घेऊन येण्याचा दिनांक, बाजार समितीत दररोज Social distance पाळणे जाईल यांचे नियोजन करुन लघू संदेशाव्दारे (SMS) संबंधितांच्या भ्रमणध्वनीवर आगाऊ कळविण्यात यावे व त्याचवेळी संबंधित खरेदी एजन्सीच्या ग्रेडरला शेतक-यांची यादी उपलब्ध करुन दयावी.

(३) कोरोना या विषाणुचा संक्रमण टाळण्याच्या दृष्टिने केंद्र शासनाने दिलेल्या निर्देश लक्षात घेऊन Social distance पाळण्यासाठी एका दिवशी कमाल २० वाहने किंवा बाजार समितीच्या क्षमतेप्रमाणे (याबाबत बाजार समितीने निर्णय घ्यावा) वाहनांना ( एकाचवेळी गर्दी टाळण्यासाठ सकाळी व दुपारी अशा टप्प्यात विभागणी करणे ) प्रवेश देण्याचा निर्णय घ्यावा.

LETER - १७

(४) वस्त्रोदयोग मंत्रालय, भारत सरकार यांच्या निर्देशाप्रमाणे हमी भावाने फक्त Fair average Quality (F.A.Q.) दर्जाच्या कापसाची खरेदी करणे बंधनकारक असल्याने, शेतक-यांची नोंदणी करतांना यांची कल्पना शेतक-यांना देऊनच नोंदणी करावी. कृषि उत्पन्न बाजार समितीव्दारे शेतक-यांच्या वाहनांना टोकन देतेवेळी F.A.Q. दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा / प्रतीचा कापूस आणल्यास तो हमी भावाने खरेदी न करता, गाडी परत करण्यात येईल असे शेतक-यांना कृषि उत्पन्न बाजार समितीने अवगत करावे व SMS मध्ये देखील नमुद करावे. तसेच यास व्यापक प्रसिध्दी दयावी.

(५) शेतक-यांची नोंदणी करतांना संबंधित शेतक-यांने यापूर्वी विक्री केलेला कापूस व पिक पेरा या सर्व बाबींचा मेळ घेऊन शेतक-यांची पात्रता निर्धारित करुनच नोंदणी करणे.

(६) कोरोना विषाणूचा प्रसार / संक्रमण रोखण्याच्यादृष्टीने शासनाने जारी केलेल्या नियमावलीनुसार शेतकरी व इतरांच्या सुरक्षिततेच्यादृष्टिने Social distance पाळणे, तोंडावर मास्क लावणे, सॅनिटाईझर किंवा साबणाने वारंवार हात स्वच्छ करणे याकरिता आवश्यक ती सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

आपला

(का.गो.वळवी)
उप सचिव (पणन)

प्रत माहितीस्तव --

१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित, मुंबई .

तातडीचे

महाराष्ट्र शासन

क्रमांक: संकीर्ण-२०२०/प्रधानसचिव/१०-स
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १७ एप्रिल, २०२०.

प्रति,

जिल्हाधिकारी,
यवतमाळ, अकोला, अमरावती, नांदेड, वर्धा, बीड, परभणी, बुलढाणा, जळगांव, चंद्रपूर, नागपूर, औरंगाबाद.

विषय:- कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी केलेल्या पहिल्या लॉकडाऊनच्या कालावधीत बंद करण्यात आलेली कापसाची हमी भावाने खरेदी पुन्हा सुरु करणेबाबत.

महोदय,

राज्यात केंद्रीय कापूस निगम (CCI) यांच्यामार्फत व CCI च्यावतीने महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित (MSCCGMF) मार्फत कापसाची हमी भावाने खरेदी सुरु होती. मात्र, कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी देशात दि.२३.०३.२०२० रोजी पासुन लागू करण्यात आलेल्या पहिल्या टप्प्यातील लॉकडाऊनच्या कालावधीत कापसाची खरेदी आपल्या आदेशानुसार स्थानिक स्तरावरील वेगवेगळ्या कारणास्तव बंद करण्यात आली आहे.

२. देशात दुस-या टप्प्यात लॉकडाऊनचा कालावधी दि.०३.०५.२०२० रोजीपर्यंत वाढविण्यात आला आहे. मात्र, या लॉकडाऊन कालावधीसंदर्भात कोरोना विषाणूचा संक्रमण टाळण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वे केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने दि.१५.०४.२०२० रोजी निर्गमित केल्या आहेत. या सुधारित मार्गदर्शक तत्वानुसार कृषि उत्पन्न बाजार समितीमधील कृषि शेतमालाची खरेदी-विक्री व कृषि शेतमालाची हमी भावाने खरेदी करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे राज्यात कापसाची हमी भावाने पुन्हा खरेदी सुरु करणे आवश्यक आहे. काही जिल्ह्यात यापूर्वीच हमी भावाने कापूस खरेदीस परवानगी देण्यात आली आहे. तरीसुध्दा राज्यात सर्व ठिकाणी CCI व MSCCGMF यांच्यामार्फत कापसाची हमी भावाने खरेदी सुरु करण्याची परवानगी आपल्यास्तरावरुन खालील अटींच्या अधिन राहुन देण्यात यावी.

(१) जिनींग प्रेसिंग फॅक्टरीचे परिसरात कापूस खरेदी व प्रक्रियेच्या कामकाजाकरिता सेवक, मजूर व हमाल यांची उपस्थिती आवश्यक असल्याने त्यांना आपण ठरविलेल्या पध्दतीने परवानगी देण्यात यावी.

(२) आरोग्य विभागाव्दारे कोरोना विषाणूचे संक्रमण रोखण्याकरिता देण्यात आलेल्या नियमावलीचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित जिनींग प्रेसिंग फॅक्टरी यांना उपयुक्त सुचना दयाव्यात.

(३) कोरोना या विषाणुचा संक्रमण टाळण्याच्या दृष्टिने केंद्र शासनाने दिलेले निर्देश लक्षात घेऊन Social distance पाळण्यासाठी एका दिवशी कमाल २० वाहने किंवा बाजार समितीच्या

LETER - ९३

क्षमतेप्रमाणे (याबाबत बाजार समितीने निर्णय घेतील / घ्यावा ) वाहनांना ( एकाचवेळी गर्दी टाळण्यासाठी सकाळी व दुपारी अशा टप्प्यात विभागणी करणे ) येण्या व जाण्यासाठी ई-पास देण्यात यावा घ्यावा.

(४) वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकार यांच्या निर्देशाप्रमाणे हमी भावाने फक्त Fair average Quality (F.A.Q.) दर्जाच्या कापसाची खरेदी करणे बंधनकारक असल्याने, F.A.Q. दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा / प्रतीचा कापूस खरेदी संदर्भात खाजगी व्यापा-यांना कोरोना संदर्भात दिलेल्या सुधारित नियमावलीच्या अधिन राहून कापूस खरेदीस परवानगी देण्यात यावी.

(५) कापसावरील प्रक्रियेनंतर प्राप्त होणारी सरकी विक्रीसंदर्भात सरकी खरेदीदार तसेच गाठी वाहतुकदार यांना जिल्हांतर्गत व जिल्हाबाहेर तसेच राज्यात व राज्याबाहेर वाहतुकीची परवानगी देण्यात यावी.

(६) कापूस खरेदी व प्रक्रियेसंदर्भात नियुक्त असलेले सर्व अधिकारी, कर्मचारी, मजूर, हमाल इत्यादिंना जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीचे ठिकाणी व त्या त्यांचे निवासस्थानी येणे-जाणे करिता ओळखपत्रे / पासेस देण्यात यावेत.

आपला स्नेहांकित

अनूप कुमार

(अनुप कुमार, भा.प्र.से.)

प्रधान सचिव (पणन)

प्रत माहितीस्तव --

१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित, मुंबई .

१५/०४/२०२०

प्रति,

जिल्हा उपनिबंधक (कापूस उत्पादक जिल्हे)

सहकारी संस्था.

शासनाने मा. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या सूचनांप्रमाणे उचित कार्यवाहीस्तव रवाना

१३/०४

संचालक (पणन)

महाराष्ट्र राज्य, पुणे